# 'संविधानाच्या स्वप्नातलं गाव'ला प्रकाश किरणचा उत्कृष्ट साहित्यकृती सन्मान

सातारा : येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमधील मराठी विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. सुभाष वाघमारे यांच्या 'संविधानाच्या स्वप्नातलं गाव' या कवितासंग्रहास श्रीरामपूर येथील प्रकाश किरण प्रतिष्ठानने 'उत्कृष्ट साहित्यकृती सन्मान पुरस्कार दिला आहे. प्रकाश किरण प्रतिष्ठान श्रीरामपूर हे प्रतिष्ठान गेली १४ वर्षे राज्यस्तरावरील साहित्यकृती मागवून घेऊन त्यांचे परीक्षण करून उत्कृष्ट साहित्यकृतीस सन्मानपत्र व सन्मान चिन्ह प्रदान करीत असते. यावर्षी शासकीय नियमास अनुसरून कोविड १९ मुळे कार्यक्रम घेता येत नसल्याने त्यांनी राज्यातील उत्कृष्ट साहित्यकृती निवड करून त्या साहित्यिकांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र पोस्टाने पाठविण्याची व्यवस्था केली.२१ जानेवारी २०२२ रोजी होणारा कार्यक्रम रद्द झाल्याने निवड झालेल्या साहित्यिकांना घरपोच पुरस्कार पाठवण्यात आले.प्रा. डॉ. सुभाष वाघमारे यांच्या 'संविधानाच्या स्वप्नातलं गाव 'या कविता संग्रहास हा सहावा पुरस्कार मिळाल्याने त्यांचे हितचिंतकांनी आनंद व्यक्त केला. वाचन संस्कृती प्रतिष्ठान श्रीरामपूर यांचा राज्यस्तरीय समाजप्रबोधन काव्य पुरस्कार, रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेजचा रुपये ५000चा क्रियेटीव्ह लिटरेचर राईटिंग अवार्ड, न्यूज पेपर गंगाधर साहित्य परिषद गारगोटी यांचा राज्यस्तरीय काव्य पुरस्कार, सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील स्मारक समितीचा दीनमित्रकार मुकुंदराव पाटील साहित्य पुरस्कार, शब्दकळा साहित्य संघ मंगळवेढा यांचा राज्यस्तरीय काव्य पुरस्कार आणि हा प्रकाश किरण प्रतिष्ठानचा उत्कृष्ट साहित्यकृती सन्मान असे सहा पुरस्कार मिळाल्याने रयत शिक्षण संस्थेचे सचिव व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, रयत शिक्षण संस्थेचे ऑडीटर प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, गुणवत्ता हमी कक्षचे समन्वयक उपप्राचार्य प्रोफेसर डॉ. अनिलकुमार वावरे, उपप्राचार्य डॉ. रोशनआरा शेख, उपप्राचार्य डॉ.रामराजे माने देशमुख,स्टाफ वेल्फेअरचे विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ.शिवाजी पाटील, रजिस्ट्रार डॉ.अरुणकुमार सकटे, अधीक्षक तानाजी सपकाळ मराठी विभागातील डॉ. कांचन नलावडे, प्रा. गजानन चव्हाण, डॉ. संजयकुमार सरगडे, प्रा. प्रियांका कुंभार तसेच मराठी विभागातील विद्यार्थी यांनी त्यांचे अभिनंदन केले. प्रकाश किरण प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष लेविन भोसले यांनी कानोसा समाज मनाचा आणि वेध सामाजिक जाणिवांचा ही स्वतः लिहिलेली दोन पुस्तके भेट देऊन त्यांचे अभिनंदन केले .तसेच या प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष किरण भोसले ,कोषाध्यक्ष विजया भोसले ,सदस्य पल्लवी भोसले ,प्रकाश भोसले,अनुराधा भोसले ,आकाश भोसले,अवनी भोसले यांनीही त्यांचे अभिनंदन केले. प्रोफेसर डॉ.सुभाष वाघमारे यांचे मळोली गावातील समता प्रतिष्ठान सेवाभावी संस्थेचे कार्यकर्ते तुकाराम लोखंडे, भीमराव मोरे ,नवनाथ वाघमारे ,शिवाजी वाघमारे ,सम्यक शाक्यरत्न , वैशाली बागाव, तुकाराम वाघमारे,मळोली गावातील हितचिंतक ग्रामस्थ व परिसरातील परिवर्तनवादी चळवळीतील अनेक कार्यकर्ते यांनी त्यांचे अभिनंदन केले आणि पुढील लेखनासाठी शुभेच्छा दिल्या.